# राशिभविष्य - मार्च, २०२२

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

**==================================================================**

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या राशीच्या आपल्या जन्मनक्षत्रासाठी असलेल्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून, श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे,व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही आपल्या राशीच्या आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा मनापासून श्रद्धेने उपयोग करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

**==================================================================**

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत हर्षल असून महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी वृषभ राशीत असलेला असलेला राहू प्रथम स्थानी याच राशीत येत आहे. हर्षलमुळे या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी, धाक,दडपण सहन न होणारा असा झाला असण्याची शक्यता वाटते. या राशीची लहान मुले तर सध्या अतिशय खोडकर झाली असण्याची शक्यता दिसते. पण हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होऊ शकेल. महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी असलेला राहू प्रथम स्थानी आल्यावर या राशीच्या काही मंडळींना वातविकार त्रस्त करण्याची शक्यता आहे. तसेच अपघात भय असल्याने सतत सावधानतेने आचरण करणे आवश्यक होईल. काही मंडळींच्या मनात सूडभावना निर्माण होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात हा राहू धनस्थानी असताना कौटुंबिक जीवनात कलह व या राशीच्या नोकरदार मंडळींना आर्थिक चिंता निर्माण करील. या राशीच्या अष्टम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून महिन्याच्या संपूर्ण काळात त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात येथील केतू या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत आल्यावर मनस्थिती अस्थिर होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत मंगळ, शुक्र व शनि असे तीन ग्रह असून येथील मंगळामुळे स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल. नोकरीत कामाचा असह्य ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. शुक्रामुळेही नोकरी-व्यवसायात अडचणी, मनस्ताप सहन करावा लागेल. शनि ग्रह लोखंड,पोलाद यांचा व्यापार असणारांना व यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या

लाभस्थानी कुंभ राशीत रवि, बुध, गुरु  व नेपच्यून  असे चार ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या व्ययस्थानी  मीन  राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या  पूर्वार्धात रवि या राशीच्या नोकरदार मंडळींना  अनुकुल  व लाभदायक .होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात  तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नोकरीत प्रतिकुल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता दिसते. . बुध -गुरुमुळे इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गानी धनलाभ होईल  व नवे   मित्र मिळतील. पण  नेपच्यून मात्र प्रतिकुलच   होईल व त्याच्यामुळे व्यवसायात आर्थिक घोटाळे, कुमार्गी मित्रांकडून  मनस्ताप, आर्थिक नुकसान, होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगजाननाची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर "श्रीगणेश  अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा.रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी  मेष राशीत जात आहे. व्ययस्थानी मेष राशीत प्रथमपासून हर्षल आहेच. महिन्याच्या पूर्वार्धात राहूमुळे अपमानकारक घटना घडण्याची शक्यता आहे. तसे घडल्यास  मनात  सूडभावना  निर्माण  होईल. जपा. या राशीच्या काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त  करीतसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू या राशीच्या व्ययस्थानी  गेल्यावर या  राशीच्या  काही मंडळींना  परदेशगमनाची संधी मिळेल.  काही मंडळींना अर्थलाभ होईल. पण काही  कारणामुळे  वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. व्ययस्थानी असलेला  हर्षल प्रतिकुल  असल्यामुळे काही  मंडळींना  सांपत्तिक अडचणी त्रस्त  करतील. काही  मंडळींना  वाईट प्रसंगाला  तोंड द्यावे  लागेल. शिवाय तो  काहीही  करणाने  शत्रुत्व निर्माण करील. जपा. या राशीच्या  सप्तम  स्थानी वृश्चिक  राशीत केतू असून  महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या  षष्ठ स्थानी तुळा राशीत  जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो वैवाहिक जीवनातील  सुखात  बाधा निर्माण करील.  त्यामुळे मनस्थिती अस्थिर  राहील. पण  महिन्याच्या  उत्तरार्धात  तो अनुकुल  होईल  व त्याच्यामुळे आरोग्य  उत्तम  राहील, मनस्थिती उदार होईल,  सहकार्य लाभेल.  या राशीच्या भाग्यस्थानी  मकर  राशीत मंगळ,  शुक्र व  शनि असे  तीन  ग्रह असून मंगळामुळे प्रवासात  मनस्ताप व मानहानी  होणे संभवते. म्हणून शक्यतो  प्रवास करू नका. शुक्रामुळे गुरुकृपा,  सुसंगती, थोरकृपा, ऐषाराम लाभेल.  काही मंडळींना  कीर्ती, प्रसिद्धी मिळण्याची  शक्यताही  दिसते.  शनिमुळे प्रगल्भ  बुद्धी प्राप्त  होईल व  त्यागी वृत्ती होईल.  तसेच

कायदा, तत्वज्ञान यांचा अभ्यास करत असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत रवि -बुध - गुरु व नेपच्यून असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हा रवि या राशीच्या सर्व मंडळींना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. बुधामुळे मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना गुरु ग्रह अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार असणारांना लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा व ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात हा राहू अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना अर्थलाभ होईल; तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण तो कौटुंबिक सुखास बाधकच होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत गेल्यावर काही मंडळींना नोकरीत आपल्या अधिकाराचा गैर वापर करण्याची तीव्र इच्छा त्रस्त करील. पण त्यांनी तो मोह प्रयत्नपूर्वक टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. काही मंडळींना जुगारात सधन होण्याचा मोह होईल. त्यांनी सुद्धा त्यापासून दूरच राहावे. .शिवाय या राहूमुळे संततीविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. या लाभस्थानी प्रथमपासून हर्षल आहेच. पण त्याच्यामुळे मित्रांशी भांडण होण्याची दाट शक्यता दिसते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल होईल. आरोग्य उत्तम राहील. आचारविचार उच्च राहतील, काहींना प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात पंचम स्थानी गेल्यावर या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण करण्याची शक्यता आहे. तसेच काही मंडळींना पोटाचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मकर राशीत मंगळ, शुक्र व शनि असे तीन ग्रह असून मंगळामुळे उष्णताविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय हाडमोड होणेही संभवते. त्याशिवाय त्याच्यामुळे वीज-पाणी- यांपासून धोका असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. येथील शुक्र अनुकुल होईल व त्याच्यामुळे कमी श्रमात अर्थलाभ

होईल. शिवाय ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. परंतु या राशीच्या वृद्ध मंडळींना हा शुक्र प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. येथील शनि दु:ख, दैन्य देतो. शनि -मंगळ हे शत्रू ग्रह अष्टम स्थानी असल्याने प्रतिकुल परिस्थितीला सतत तोंड द्यावे लागते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत रवि -बुध -गुरु व नेपच्यून असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात या रविमुळे मानसिक ताण व वडीलधाऱ्या मंडळींचा विरोध सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व सर्व प्रकारे लाभदायक होईल. बुध ग्रह प्रतिकुल असून त्याच्यामुळे वाद, भांडणे होतील, नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. पण गुरु ग्रह बौद्धिक व आध्यात्मिक कार्यक्षेत्रात असलेल्याना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मन:शांती लाभेल. या भाग्यस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. आध्यात्मिक उपासना करत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने जगदंबा “दुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः: शंकराय ” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीचा लाभस्थानी वृषभ राशीत राहू असल्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या शासकीय नोकरीत अधिकार पद असणारांना आपल्या पदाचा दुरुपयोग करण्याचा मोह त्रस्त करील. म्हणून त्यांनी मनावर ताबा ठेवून सरळ मनाने आचरण करावे. तेच सुखाचे होईल. ज्यांना जुगाराचा नाद आहे त्यांनीही त्या मोहावर नियंत्रण ठेवावे. शिवाय येथील राहूमुळे संततीविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. उत्तरार्धात हा राहू या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत जात आहे. त्यावेळी तो अनुकुल होईल व या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. या दशम स्थानी मेष राशीत प्रथमपासून हर्षल आहेच. तो बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत जात आहे. महिन्याचा पूर्वार्धात ह्या केतूमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच काही मंडळींना

पोटाचे अनारोग्य त्रस्त करीतसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात हा केतू या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत गेल्यावर घरगुती जीवनात कोणाशीही पटणार नाही. कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक होणेही संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत मंगळ -शुक्र व शनि असे तीन ग्रह असून येथील मंगळ ग्रहामुळे या राशीच्या मंडळींच्या वैवाहिक जीवनात साथी /संगिनीच्या आरोग्यविषयक समस्येमुळे किंवा दोघांतील मतभेदामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. पण येथील शुक्रामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशयाने किंवा गैरसमजाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या स्थानी असलेला शनि मकर या स्वराशीत असल्यामुळे मनस्थिती शांत व विचारशील वृत्ती राहील..या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत रवि -बुध - गुरु व नेपच्यून असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे दु:ख, अनारोग्य, अपयश, मानसिक ताण, संततिसुखात बाधा अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. पण येथील बुध -गुरु हे दोन्ही ग्रह अनुकुल असल्यामुळे परिस्थिती आटोक्यात राहील व त्यांच्यामुळे कार्यसिद्धी होईल व सुखसमाधान लाभेल. शिवाय येथील गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होणे संभवते. येथील नेपच्यून जलभय, विषभयकारक असल्यामुळे खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. श्रद्धा असेल तर “श्रीशिव शंकराची “ व “श्रीहनुमानाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी “ओम बृहस्पतये नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी “ओम सर्पाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत जात आहे. या भाग्यस्थानी मेष राशीत प्रथमपासून हर्षल आहेच. हा राहू महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे शासकीय नोकरीत असणारांपैकी काहींना एखादे अधिकार पद मिळण्याची शक्यता आहे. तसेच क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर प्रवासयोग येतील. भाग्यस्थानी असलेल्या हर्षलमुळे

काही मंडळींना परदेशवारीची संधी मिळेल. शिवाय हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असलेल्या मंडळींना प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत रवि -बुध-गुरु व नेपच्यून असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो केंद्रस्थानी असल्याने भाग्योदयकारक होणार असला तरी तो अनारोग्यकारक होण्याचीच अधिक शक्यता आहे. शिवाय त्याच्यामुळे हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणेच संभवते. त्यामुळे इच्छाआकांक्षा अपूर्ण राहतील. तसेच त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. येथील बुध सुद्धा प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे वाद, भांडणे, वियोग अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. पण सोबत गुरु असल्यामुळे काही मनोनुकुल घटना घडतील. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील व प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. शिवाय काही मंडळींना अर्थलाभ होणेही संभवते. पण या स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काही मंडळींच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत मंगळ -शुक्र -शनि असे तीन ग्रह असून येथील मंगळामुळे अनारोग्य, अपप्रचार व अर्थहानी किंवा चोरी होणे संभवते. शुक्रामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकारांना उच्च गुणवत्ता असूनही प्रगतीची व प्रसिद्धीची संधीच मिळणार नाही. त्यामुळे काही कलाकार नैराश्य येऊन व्यसनाधीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शनीमुळे गैरसमजुतीतून वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. त्यातून अकारण शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यता दिसते. तसेच तो अनारोग्यकारक होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत केतू असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत जात आहे. त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय तो विषभयकारक होणेही संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात तो अधिक मनस्तापदायक होण्याचीच शक्यता आहे. अशा परिस्थितीत आध्यात्मिक उपासनाच मन:शांती देऊ शकेल. श्रद्धा असेल तर मनापासून श्रद्धेने श्रीभगवान विष्णूची उपासना अनुकुल होईल व त्यातून मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर “विष्णुसहस्रनाम स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ ओम आर्यमे नम:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो या महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत जात आहे. त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींना

मानसिक दु:ख सहन करावे लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत मंगळ -शुक्र-शनि असे तीन ग्रह असून येथील मंगळामुळे संततीपैकी कोणाच्या गैर आचरणामुळे मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना स्थावरसंबंधी समस्येचा त्रास सहन करावा लागेल. शिवाय तो अनारोग्यकारक होणेही संभवते. पण येथील शुक्र सर्व प्रकारच्या कलाकारांना त्यांच्या कलेत प्रगती करण्याच्या दृष्टीने अनुकुल होईल. शनीमुळे बुद्धी स्वार्थी, व्यवहारी, संशयी होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत रवि -बुध - गुरु-नेपच्यून असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात या रविमुळे हितशत्रू पराभूत होतील. शिवाय तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. तसेच तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर केंद्रस्थानी असल्यामुळे भाग्योदयकारक होईल. पण काही मंडळींना अनारोग्याचा त्रास होण्याची शक्यता आहे. बुधामुळे कार्यसिद्धी होईल, अर्थलाभ होईल. गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील. पण नेपच्यूनमुळे काही मंडळींना उगीचच एखादी आजारभावना किंवा काल्पनिक चिंता त्रस्त करील. काही मंडळींना फसवणूक झाल्याचा त्रास होणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी हर्षल असून तो अपघातकारक असल्याने सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत जात आहे. त्या काळात वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा निर्माण होणे संभवते. पण मनावर ताबा ठेवा व तसा प्रयत्न करू नका. त्याशिवाय अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "दुर्गा स्तोत्रा" चे पठण करा, रात्री झोपी जाण्यापूर्वी "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी "ओम सूर्याय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत जात आहे. या सप्तम स्थानी मेष राशीत प्रथमपासून हर्षल आहेच. म्हणून महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या शासकीय नोकरीतील ज्या मंडळींना अधिकार पद प्राप्त झाले आहे अशापैकी काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याचा मोह होणे संभवते. पण त्यांनी प्रयत्नपूर्वक असा मोह टाळावाच. काही मंडळींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर या राशीच्या काही मंडळींना वाईट मार्गाने प्रसिद्धी मिळण्याची शक्यता

आहे. जपा. तसेच काही मंडळींना आर्थिक नुकसान सहन करावे लागेलसे दिसते. येथील हर्षलमुळे पतिपत्नीपैकी कोणाच्या तरी विक्षिप्त आचरणामुळे किंवा दोघांतील मतभेदामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत रवि -बुध -गुरु व नेपच्यून असे चार राहू असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी मींन राशीत जात आहे. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपैकी कोणाच्या तरी दूरत्वामुळे येणारी अस्वस्थता, संतति समस्या अशापैकी कारणामुळे मन अस्वस्थ राहील. हा रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. हितशत्रू पराभूत होतील, काहींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या पंचम स्थानी असलेल्या बुधामुळे सुद्धा संततिसुखात व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. पण गुरु ग्रह अनुकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. ज्यांचे प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करणे सहज शक्य होईल. नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल व भावनाशील होईल. पण तो आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होणार असल्याने उपासनेद्वारे मन:शक्ती व मन:शांती प्राप्त होऊ शकेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत मंगळ - शुक्र व शनि असे तीन ग्रह असून मंगळामुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना अशापैकी कारणांनी सुखात बाधा येणे संभवते. जपा. शुक्र या राशीच्या शेतीवाडी असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. सुखसमाधान लाभेल. पण शनि ग्रह स्वराशीत असला तरी स्थान अनुकुल नसल्यामुळे तो प्रतिकुल होईल व मनस्ताप देणाऱ्या घटना घडल्यास गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत केतु असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करील. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या प्रथम स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व सर्व सुख लाभेल. पण त्याच्यामुळे वाहन धोका असल्यामुळे आपले वाहन सावधानतेने व नियंत्रित वेगाने चालवा. रस्त्यातून सावधानतेने मार्गक्रमण करा. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्री हनुमानाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः: " तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:": तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

(८) **वृश्चिक** - या राशीच्या प्रथम (लग्न ) स्थानी याच राशीत केतू असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या व्ययस्थानी तुळा राशीत जात आहे. म्हणून महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल व सुखकारक होईल; पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे स्वभाव लहरी होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत मंगळ - शुक्र -शनि असे तीन ग्रह असून येथील मंगळामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल. काही मंडळींकडून एखादी कर्तबगारीची घटना घडून येणे संभवते. पण येथील शनि- मंगळ शत्रु ग्रह युतीत असल्यामुळे एखादी इजा होण्याची शक्यता आहे. जपा. पण स्वराशीत असलेल्या शनीमुळे काही मंडळींना मनपसंत अशी नोकरी लागण्याची शक्यता आहे. काही मंडळींना आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करीलसे दिसते. शुक्रामुळे धनलाभ, प्रतिष्ठा, मानसन्मान असे काही प्राप्त होणे संभवते. काही मंडळींना भूमिलाभ होणेही शक्य आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत रवि -बुध -गुरु व नेपच्यून असे चार ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, कौटुंबिक त्रास, कार्यदिरंगाई, अकारण खर्च होणे, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, संततिविषयक चिंता, प्रियजनांपासून होणारा दुरावा अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. बुधामुळे गृहसौख्य व मित्रसुख मिळेल, पण धननाश होणेही संभवते. जपा. पण गुरु ग्रह अनुकुल असल्यामुळे कौटुंबिक सुखात फारशी बाधा येणार नाही. त्याशिवाय ज्यांचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होणार असतील तर ते अपेक्षेनुसार पार पडतील. पण येथील नेपच्यूनमुळे घरगुती जीवनात गैरसमज, घोटाळे अशापैकी घटनांचा त्रास होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत हर्षल असून त्याच्यामुळे काही मंडळींना मुदतीचा ताप येणे, डोकेदुखी किंवा सतत खोल विचार करत राहिलात तर मेंदूविकार यांचा आजार होणे, मनस्थिती अस्थिर, चंचल होणे अशापैकी आजार होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात सप्तम स्थानी वृषभ राशीत असलेला राहू षष्ठ स्थानी आल्यावर काही मंडळींना अनारोग्याचा त्रास होणे संभवते. पण ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध असेल त्यांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे मनात कपटी विचारांचा जोर होण्याची शक्यता दिसते. शिवाय वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर श्रीगणपतीची व श्री हनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून, श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या व्ययस्थानी  वृश्चिक राशीत केतू  असून महिन्याच्या उत्तरार्धात  तो या राशीच्या लाभस्थानी  तुळा  राशीत  जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींचा स्वभाव चंचल, लहरी  होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात  तो अनुकुल, मनोनुकुल, यशदायक व लाभदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे प्रवासाचे योग येतील.  या राशीच्या  षष्ठ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत  जात आहे.  त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात अनारोग्याचा त्रास होणे संभवते. पण ज्या मंडळींचा परधर्मियांशी  व्यावसायिक संबंध आहे  अशांना तो लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू  या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे काहीही कारणाने संततिसुखात  बाधा येणे संभवते. शिवाय तो या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे  निर्माण करील. त्याशिवाय  वैवाहिक  जीवनातील सुखासही  बाधक होण्याची शक्यता दिसते.  या पंचम स्थानी  मेष राशीत प्रथमपासून  हर्षल आहेच.  त्यामुळे तो  कलापोषक होईल,  उच्च बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना  तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत रवि -बुध -गुरु व नेपच्यून  असे चार ग्रह असून येथील रवि  महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन  राशीत जात आहे.  त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल  होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल, आरोग्य उत्तम राहील, शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना बढती मिळू शकेल, क्वचित कोणाचा सन्मान केला जाईल, तर कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी नेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे नियोजित कार्यात अडचणी, अडथळे, दिरंगाई  होणे .संभवते. त्याशिवाय आर्थिक समस्या, कौटुंबिक त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते.  या राशीच्या तृतीय स्थानी असलेला  बुधही प्रतिकुलच  होईल व त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होणे संभवते.  गुरु ग्रह बौद्धिक  कार्यास अनुकुल होईल, या राशीच्या लेखकांचे लेखन  ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल, प्रवास योग येईल; पण भावंडांपैकी कोणाकडून तरी  मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते.  येथील नेपच्यूनमुळे मनस्थिती  अति भावनाशील होईल. पण अध्यात्म, गूढ संशोधन  अशा क्षेत्रात रस असणारांना तो अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल.  या राशीच्या धनस्थानी मकर राशीत मंगळ,शुक्र व शनि  असे तीन ग्रह  असून  येथील मंगळ व शनि प्रतिकुल  होतील व त्यांच्यामुळे अनपेक्षित आर्थिक जबाबदारी येणे संभवते.  देणे द्यावेच लागेल; पण येणे वसूल  होईलच याची खात्री देता येणार नाही. त्याशिवाय  या  मंगळामुळे  आरोग्याच्या दृष्टीने उष्णताविकार बळावतील  व घसा, मान, डोळे यांचे दुखणे त्रस्त  करील. शनीमुळे  आर्थिक संकटे  त्रस्त करतील व कुटुंबात काही अनिष्ट घडण्याची शक्यता जाणवते. जपा. अशा प्रतिकुल परिस्थितीत येथील  केवळ शुक्रच  अनुकुल होईल व त्याच्यामुळे मनोनुकुल

घटना घडतील, धनलाभ होईल व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल आणि मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी " ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी तुळा राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अनुकुल व सुखकारक होणार असून त्याच्यामुळे प्रवास योग येतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे काही मंडळींच्या नोकरीवर गदा येण्याची शक्यता दिसते. जपा. काही मंडळींच्या मनात हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि येईल; पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरीच करावी. तेच सुखाचे होईल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत जात आहे. या चतुर्थ स्थानी प्रथमपासून हर्षल आहेच. त्यामुळे हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे मनस्थिती सतत अस्वस्थ राहील, कशातही सुखसमाधान लाभणार नाही, कोणाशी पटणार नाही, वैवाहिक व कौटुंबिक सुखात तसेच संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या धन स्थानी रवि - बुध -गुरु व नेपच्यून असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी जात आहे. त्यामुळे रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे वाढता खर्च, वित्त हानी, अन्य आर्थिक समस्या यांना तोंड द्यावे लागेल. येथील नेपच्यूनमुळेही आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. बुध ग्रहही प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे मनस्ताप व दु:ख सहन करावे लागेल. केवळ गुरु अनुकुल होणार असून त्याच्यामुळे परिस्थिती आटोक्यात राहील. त्याच्यामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील, उत्तम अर्थलाभ होईल. शिवाय महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह अनुकुल होईल व सर्व काही अनुकुल व सुखाचेच घडेल. आरोग्य उत्तम राहील व नोकरीत मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी मंगळ, शुक्र व शनि असे तीन ग्रह असून येथील मंगळ व शनि प्रतिकुल होतील व मंगळामुळे स्वभाव हट्टी होईल, अकारण श्रम व दगदग कराल, अनारोग्य होईल व नोकरीत प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. शनीमुळेसुद्धा काही मंडळींना वातविकाराचा त्रास होईल, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होतील, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे स्थलांतर झाल्यास मन अस्वस्थ होईल. पण काही मंडळींना

दूरच्या प्रवासाचे योग येणे संभवते. अशा परिस्थितीत शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी "ओम विष्णवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -बुध - गुरु व नेपच्यू न असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी मीन राशीत जात आहे. त्यामुळे हा रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, थकावट, चिंता, मनस्ताप, आर्थिक समया, वित्तहानी, भांडणे, डोळ्याची दुखणी अशापैकी क्लेशदायक घटना घडण्याची दाट शक्यता आहे. जपा. येथील बुधामुळे धननाश, मित्रद्रोह होणे संभवते. शिवाय मनस्थिती अस्थिर, चंचल होईल व त्यामुळे काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणे संभवते. नेपच्यूनमुळे मनस्थिती अति कोमल होईल व त्यातून मानसिक संवेदना जलद निर्माण होतील व मन उदास होऊन नैराश्य येईल. अशा प्रतिकुल परिस्थितीत केवळ गुरु ग्रहच अनुकुल होईल, व त्याच्यामुळे बौद्धिक, शैक्षणिक, संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या लेखकवर्गालाही तो अनुकुल होईल. त्याच्यामुळे आरोग्य सुधारेल व नोकरीत काही मंडळींना अधिकार पद मिळणेही संभवते. . या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत हर्षल असून महिन्याच्या उत्तरार्धात चतुर्थ स्थानी असलेला राहू या तृतीय स्थानी येत आहे. येथील हर्षल उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या मंडळींची समरणशक्ती, आकलनशक्ती प्रबळ व चौकस होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत असलेला राहू महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात काहीही कारणाने वाद, गैरसमज, भांडणे होणे संभवते. हाती घेतलेल्या कार्यात अपयश येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत गेल्यावर अनुकुल होईल व परिस्थितीत एकदम सुधारणा होईल. मन उत्साहित व उदार होईल, हातून कर्तृत्व घडेल. पण हा राहू बंधुसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत केतु असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी तुळा

राशीत जात आहे. म्हणून महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि अस्वस्थ करील. पण मोहाला बळी पडाल तर हातची नोकरीही गमावून बसाल. म्हणून तो मोह कटाक्षाने टाळाच. शिवाय महिन्याच्या उत्तरार्धात हा केतु भाग्यस्थानी तुळा राशीत गेल्यावर काही मंडळींचे " वरून कीर्तन, आतून तमाशा" अशा प्रकारचे ढोंगी, धूर्त आचारण होणे संभवते. शिवाय येथील केतूमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत मंगळ , शुक्र व शनि असे तीन ग्रह असून येथील मंगळ व शनि हे दोन्ही ग्रह पूर्णपणे प्रतिकुल होतील. मंगळामुळे अस्वस्थ मनस्थिती होईल. आर्थिक चिंता सतावतील. भांडणे होतील. मानहानी होणेही संभवते. शनीमुळे आर्थिक व्यवहार काळजीपूर्वक न केल्यास परिणामतः: नसते लचांड मागे लागेल. जपा. पण येथील शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व काही प्रमाणात दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती व मन:शक्ती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी "ओम वरुणाय नम:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा भाद्रपदा आहे त्यांनी " ओम अजैकचरणाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत रवि -बुध - गुरु व नेपच्यून असे चार ग्रह असून येथील रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी जात आहे. त्यामुळे हा रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल, व त्याच्यामुळे अनारोग्य, शरीरपीडा, मनस्ताप व मानभंग होणे संभवते. थकावट जाणवेल. आर्थिक चिंता त्रस्त करील. बुध ग्रहही प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मनस्थिती चंचल, अस्थिर होईल. काही मंडळींना अनारोग्याचा त्रास तर काहींना मानहानी, अपयश सहन करावे लागेल. त्याशिवाय आर्थिक नुकसान होणेही संभवते. नेपच्यूनमुळे चिंता व मनस्ताप सहन करावा लागेल. त्यामुळे गहिरे नैराश्य येईल. पण हा नेपच्यून गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना उपयुक्त होईल. येथील गुरु अध्यात्म, समाजसेवा असे कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे प्रवासात अडचणी येणे संभवते. शिवाय अपेक्षाभंग होणे व कौटुंबिक त्रास सहन करावा लागणे संभवते. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत हर्षल असून महिन्याच्या उत्तरार्धात तृतीय स्थानी वृषभ राशीत असलेला राहू या धनस्थानी येत आहे. येथील हर्षलमुळे विचारशक्ती अति अस्थिर होईल व त्यामुळे हातून विचित्र आचरण घडणे संभवते. शिवाय आपल्या फट्कळ बोलण्याने समोरच्याचा अकारण अपमान केला जाईल. जपा. राहूमुळे

महिन्याच्या पूर्वार्धात मनस्थिती हरहुन्नरी, उदार अशी होईल, हातून काही कर्तृत्व घडेल; पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू या राशीच्या धनस्थानी गेल्यावर आर्थिक चिंता त्रस्त करतील, कुटुंबात भांडणे होतील, व जीवनसाथी/संगिनीला अतोनात कष्ट व मनस्ताप सहन करावे लागतील. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत केतु असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात या केतूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच धूर्त, ढोंगी आचरण घडण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात या केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी मकर राशीत मंगळ,शुक्र व शनि असे तीन ग्रह असून मंगळामुळे कष्ट परिश्रम करूनच अपेक्षित अर्थलाभ होईल. शिवाय त्याच्यामुळे मैत्रीत बाधा निर्माण होणे संभवते. . पण त्याच्यामुळे काही मंडळींना एखादी मौल्यवान भेटवस्तू मिळण्याची शक्यता दिसते. मंगळाशी शत्रुत्व असलेला शनि मात्र सर्वसाधारण्पणे शुभ होईल व आर्थिक स्थिती सुधारेल. पण तो संततिसुखास बाधकच होईल. येथील केवळ शुक्रामुळे अर्थलाभ होईल व सर्व सुख व मन:शांती लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शक्ती व मन:शांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====°°°°°0°°°°°=====